नि. फौ. ख. क्र.६६/२०२१
सरकार विरुध्द पांडुरंग कदम
निशाणी क्र. १७

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१**
मी शपथेवर निवेदन करतो की,

नाव– **सुरेश बालाजी कदम,**
वय–**२५** वर्षे, व्यवसाय– **शेती,**
रा. **येलापुर, ता. धर्माबाद, जि. नांदेड.**

**<u>सरकारी वकील श्री.ए.ए.शिखरे यांच्या मार्फत साक्षीदाराचा शपथेवरील सरतपास सुरु.</u>**

मी आरोपीला ओळखतो. तो माझ्या गावातील आहे. मला ब–याच गोष्टी आठवत नाहीत. दिनांक ०७/१०/२०२१ रोजी काय झाले होते, हे मला आठवत नाही. मी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती किंवा नाही हे आठवत नाही. आता साक्षीदाराला त्याची मुळ फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकुर मला माहिती नाही. त्यावर माझी सही आहे. **<u>मुळ फिर्याद वरील सहीस निशाणी क्र.१८</u>** देण्यात येते.

**{साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने त्यास उलट तपासाच्या स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी सहा. सरकारी वकील यांनी मागितली. परवानगी देण्यात येते.}**

०२. दिनांक ०७/१०/२०२१ रोजी आरोपी आणि माझ्यामध्ये काही घडले नाही. त्यादिवशी आरोपी व हानमंत कदम यांच्या दरम्यान पैश्याच्या कारणावरुन आरोपीच्या घरासमोर बाचाबाची सुरु होती, हे मला आठवत नाही. हे खरे आहे की, मी त्यांची सोडवासोडव केली. हे मला आठवत नाही की, मी त्यांची सोडवासोडव करत असताना आरोपीचा मुलगा साहेबराव याने विटेचा तुकडा घेऊन माझ्या पाठीमागुन माझ्या मानेवर जोरात मारला. हे खरे नाही की, आरोपी व त्याचा मुलगा साहेबराव यांनी मला लाथाबुक्यांनी मारहाण केली, आई–बहिणीच्या घाणेरडया शिवीगाळ केल्या व जिवे मारण्याची धमकी दिली. हे खरे आहे की, आमचे भांडण यशवंत कदम, सुभाष कदम व आनंदराव कदम यांनी सोडवले. हे खरे आहे की, मला त्रास होऊन उलटया होत असल्याने सी.टी.हॉस्पीटल नांदेड येथे उपचारासाठी पाठवण्यात आले. हे खरे आहे की, उपचार झाल्यानंतर दुस–यादिवशी दिनांक ०८/१०/२०२१ रोजी मी पोलीस ठाणे

धर्माबाद येथे येऊन फिर्याद दिली. वरील मजकुर मी पोलीसांनी सांगितला नव्हता, त्यांने तसे का लिहीले याचे कारण मी सांगु शकत नाही. फिर्यादमधील मजकुरास **अधोरेखाकिंत भाग–अ** देण्यात येत आहे. हे खरे आहे की, माझे आणि आरोपीचे प्रकरण मिटले आहे. हे खरे नाही की, माझा स्मृतीभ्रंश झाला नाही केवळ आरोपीसोबत प्रकरण मिटले असल्याने खोटी साक्ष देतो आहे.

**आरोपीचे विधीज्ञ श्री. एस.यु.जगदंबे यांनी साक्षीदाराचा उलटतपास–नाकारला.**

**फेरतपास– नाही.** माझ्यासमक्ष व श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/-

**(एस.ए.हरणे)**

**दिनांक: ०४.१२.२०२४** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.**

नि. फौ. ख. क्र.६६/२०२१
सरकार विरुध्द पांडुरंग कदम
निशाणी क्र. १८

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२**
मी शपथेवर निवेदन करतो की,

नाव– **यशवंत लक्ष्मणराव कदम,**
वय–**४८** वर्षे, व्यवसाय– **शेती,**
रा. **येलापुर, ता. धर्माबाद, जि. नांदेड.**

**सरकारी वकील श्री.ए.ए.शिखरे यांच्या मार्फत साक्षीदाराचा शपथेवरील सरतपास सुरु.**

मी फिर्यादी व आरोपी यांना ओळखतो. ते माझ्या गावातील आहेत. दिनांक ०७/१०/२०१९ रोजी आरोपी आणि फिर्यादी दरम्यान काय घटना घडली, हे मला माहिती नाही. या व्यतिरिक्त काय घटना घडली याबाबत मला काही सांगायचे नाही.

**{साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने त्यास उलट तपासाच्या स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी सहा. सरकारी वकील यांनी मागितली. परवानगी देण्यात येते.}**

०२. हे खरे नाही की, दिनांक ०७/१०/२०२१ रोजी आरोपी व फिर्यादी यांच्या दरम्यान पैश्याच्या कारणावरुन आरोपीच्या घरासमोर बाचाबाची सुरु होती. हे खरे आहे की, फिर्यादी सोडवासोडव करत असताना आरोपीचा मुलगा साहेबराव याने विटेचा तुकडा घेऊन फिर्यादीच्या पाठीमागुन फिर्यादीच्या मानेवर जोरात मारला. हे खरे नाही की, आरोपी व त्याचा मुलगा साहेबराव यांनी फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण केली, आई–बहिणीच्या घाणेरडया शिवीगाळ केल्या व जिवे मारण्याची धमकी दिली. हे खरे नाही की, त्यांचे भांडण मी, सुभाष कदम व आनंदराव कदम यांनी सोडवले. मी पोलीसांना वरील मजकुर सांगितला नव्हता. त्यांनी तसे का लिहीले आहे, याचे कारण मला माहिती नाही. साक्षीदाराच्या बयाणातील मजकुरास अधोरेखाकिंत भाग–ब देण्यात येत आहे. हे खरे आहे की, पंच म्हणुन मीच फिर्यादी व आरोपी यांच्या दरम्यानचे भांडण संपवले आहे. हे खरे नाही की, भांडण मिटल्यामुळे त्यांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**आरोपीचे विधीज्ञ श्री. एस.यु.जगदंबे यांनी साक्षीदाराचा उलटतपास–नाकारला.**

माझ्यासमक्ष व श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/–
**(एस.ए.हरणे)**
**दिनांक: ०४.१२.२०२४** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.**